## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सायकांळ)

जा.क्र. ८३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०२/२०१७

**१) ग्रामीण बिगर सहकारी पतसंस्था येथील नित्यनिधी ठेवची कॅशबुकला नोंद न घेता स्वत:च्या आर्थीक लाभाकरीता रक्कमेची अफरातफर केल्याने गुन्हा नोंद . :—**

सन २००२ ते ३१/०३/२०१५ चाचनी लेखा परीक्षण ते फेरलेखा परीक्षण करुन आज पर्यत. यातील फिर्यादी हा जिल्हा लेखा परीक्षक वर्ग १ सहकारी संस्था भंडारा येथे असुन यातील आरोपी हा दि. विदर्भ ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. खरबी नाका र.जी.क्र. ३४५ व्यवस्थापक असुन यातील आरोपीने नित्यनिधी ठेव अंतर्गत बचत अभिकर्ता कडुन खातेदारां कडुन गोळा केलेली एकुण रक्कम १८,८९,८९०/—रु. ची संस्थेच्या कॅशबुकला नोंद न घेता सदर रक्कमेचा स्वत:च्या स्वार्थाकरीता गैरवापर करुन रक्कमेची अफरातफर केल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व संस्थेचे ऑडीट रिपोर्ट अहवाल व पो.स्टे. चे जा. क्र. ८६२/१६ दि. २४/०५/२०१६ अन्वये मा. जिल्हाधीकारी सा. यांचे माफतीने सहा. निबंधक यांचे कडुन ऑडीट करुन सदर प्रकरणी अहवाल मागविण्यात आला होता त्याप्रमाणे आज रोजी ऑडीट अहवाल प्राप्त झाल्यावरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४०६ भादवी. सहकलम ३ महाराष्ट्र ठेकेदाराचा (वित्तीय आस्थापना मधील) हीत संबधाने रक्षण करण्याबाबत अधि. १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. पाटील पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई:—**

दिनांक ०१/०२/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील आरोपी हे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक क्र. सीई १०/के ४७७ हा दारू पिऊन दारूच्या नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे वैदयकीय परीक्षण ग्रामीण रुग्णालय लाखनी येथे केले असता डॉ. ने दारु पिल्याबाबतचा अभिप्राय दिल्याने पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १८५ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) अचानक प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यु. :—**

दिंनाक २१/०१/२०१७ रोजी १५.५५ वा. पुर्वी. यातील मृतक अर्जुन वंगनु चाचेरे वय ५७ वर्ष, रा. लाखनी याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्णालय भंडारा येथे नेले असता डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्रावरुन सरतर्फे फिर्यादी पोशी. वाघ पो.स्टे. लाखनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे १७४ कलम जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो. स्टे. लाखनी हे करीत आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.